# महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,

विभागीय कार्यालय, पुणे विभाग,

**५८३/ब, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे -४११०३७**

दूरध्वनी - ०२० २४२०६८८०/८८१

Email:- pune.ro@mswc.in

**Website: mswarehousing.com**

---

## निविदा (**Short Tender Notice**)

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे चिंचवड, टेल्को रोड, मोहन नगर, पुणे-४११०१९, या वखार केंद्रावरील गो.क्र.२ मधील १०,००० चौ.फुट. जागा चालू भाडे दर रु.३४/- व गो.क्र.४ मधील ४,३०० चौ. फुट. जागा चालू भाडे दर रु.१८/- + जी.एस.टी.या दराने 'जसे आहे तसे' या पद्धतीने लॉक अॅन्ड की भाडे तत्त्वावर दरात प्रती वर्षी किमान ५% दरवाढीने पाच वर्ष कालावधी करिता (३+२) देण्याचे नियोजन आहे. रांजणगांव MIDC येथील गोदाम क्र.४ मधील १०,००० चौ.फुट. व गो.क्र.३ मधील ५,००० चौ.फुट. जागा 'जसे आहे तसे' पद्धतीने लॉक अॅन्ड की भाडे तत्त्वावर दरसुची भाडे दर रु.१८.५० किंवा त्यापेक्षा जास्त दराने भाडे दरात प्रती वर्षी किमान ५% दरवाढीने पाच वर्ष कालावधी करिता (3+2) देण्याचे नियोजन आहे. त्यासाठी इच्छुक असणाऱ्या निविदाकारांकडून सिलबंद निविदा/दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सहा महिन्याचे साठवणूक भाडे विना व्याज सुरक्षा तारण ठेव म्हणून महामंडळाकडे जमा करावे लागेल. गोदामातील मालाचा विमा,गोदाम सुरक्षा व्यवस्था ,पाणी-वीज देयकाची अदायगी ठेवीदाराला करावी लागेल.

तरी इच्छुक निविदाकारांनी निविदा/दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात विभागीय कार्यालय, पुणे विभाग यांच्या वरील पत्त्यावरील कार्यालयात दि.०१.१०.२०२६ ते दि.०९.१०.२०२६ या कालावधीत दुपारी २ वाजे पर्यंत (सुट्टीचे दिवस सोडून) स्पर्धात्मक दरासहीत पोहोच होतील अश्या बेताने पाठवावेत किंवा प्रत्यक्ष पोहोच करावेत. प्राप्त निविदा/दरपत्रके विभागीय कार्यालय, पुणे विभाग यांच्या कार्यालयात दि.०९.१०.२०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता किंवा स्वतंत्रपणे जाहीर केलेल्या तारखेला उघडण्यात येतील. त्यावेळी इच्छुक निविदाकार किंवा त्यांचे प्रतिनिधी विभागीय कार्यालय, पुणे येथे उपस्थित राहू शकतील.

सदर बंद लिफाफ्यामध्ये इच्छुक निविदाकारांनी त्यांचे आर्थिक उलाढाली बाबत तीन वर्षाचा Audited Report आणि IT Return ची प्रत तसेच GST नोंदणी प्रमाणपत्र इ.आवश्यक कागदपत्रे सोबत जोडावीत .

- गोदाम भाडे तत्वावर देण्याबाबतच्या अटी व शर्ती महामंडळाच्या www.mswarehousing.com या संकेतस्थळावर पाहता येईल.
- वरील सर्व निविदा कोणतेही कारण न देता, निविदा, स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांनी राखून ठेवलेला आहे.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

**चिंचवड  व रांजणगाव वखार केंद्रावरील गोदाम भाड्याने (लॉक ॲण्ड की तत्वावर) देणेबाबत संकेतस्थळावर प्रसिद्ध करावयाच्या अटी व शर्ती**

- वखार केंद्रावरील गोदाम सुविधा '**जसे आहे तसे** ' पद्धतीने लॉक ॲण्ड की तत्वावर भाडे दरात किमान प्रती वर्षी ५% दरवाढीने पाच वर्ष कालावधी करिता (३+२) देण्याचे नियोजन आहे.
- सिलबंद लिफाफ्यात दरपत्रक स्वीकारले जाईल. दरपत्रकासोबत इच्छुक निविदाकाराने / दरपत्रकदराने त्यांचे तीन वर्षाचा आर्थिक उलाढालीबाबतचा ऑडीट रिपोर्ट आणि आय टी रिटर्न ची प्रत तसेच जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र इत्यादी आवश्यक कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे.
- गोदाम जसे आहे त्या स्थितीत ताब्यात देण्यात येईल.तथापि भाडे तत्वावरील कालावधी समाप्तीनंतर काही नुकसान झाल्याचे निदर्शनास आल्यास ठेव रकमेतून सदरच्या दुरुस्तीचा खर्च वसूल करण्यात येईल.
- लॉक-इन कालावधी –३६ महिने एवढा असेल.
- गोदाम इमारतीचा विमा महामंडळाकडून केला जाईल.
- गोदामाची किल्ली व कुलूप ठेवदाराकडे असेल. पण आपत्कालीन परिस्तिथीत एक किल्ली साठा अधिक्षक यांच्याकडे द्यावी लागेल.
- गोदामातील साठ्याच्या देखभालीसाठी एकूण मनुष्यबळाचा खर्च व इतर खर्च ठेवदाराकडून केला जाईल.
- आरक्षण कालावधी पूर्ण झाल्यावर महामंडळ आणि ठेवीदार यांच्यात परस्पर संमतीने करार नव्याने नुतनीकरण केला जाऊ शकतो.
- यशस्वी दरपत्रकाला आरक्षण मंजुरी पत्र देण्यात आल्यानंतर त्यांनी त्वरित  संमतीपत्र देऊन व ६ महिने च्या भाडे एवढी रक्कम विना व्याज सुरक्षा ठेव रक्कमेचा भरणा करुन गोदामाचा ताबा घेण्यात यावा. आणि ताबा पावती संबंधित केंद्र प्रमुखांकडे द्यावी.
- ठेवीदाराला लॉक ॲण्ड की भाडेतत्वावर घेतलेल्या गोदामाचा १५ दिवसांत नोंदणीकृत करारनामा करणे बंधनकारक आहे.सदर करारनामा नोंदणीचा व मुद्रांक शुल्काचा व त्या अनुषंगीक इ. बाबींचा सर्व खर्च ठेविदार यांनी करावा. ठेविदार यांना सदरचे आरक्षण वर नमूद अटी व शर्तींच्या आधीन राहून मान्य असल्याबाबतचे संमतीपत्र महामंडळास त्वरीत सादर करावे लागेल.
- करारनाम्यात नमूद दराने प्रत्येक महिन्याला १० तारखेपर्यंत गोदाम भाडे रक्कम महामंडळाच्या खात्यावर RTGS/NEFT द्वारे जमा करणे ठेविदार यांना बंधनकारक राहील.
- ठेविदार यांनी साठवलेल्या मालाचा विमा उतरावा व सदर विम्याची प्रत संबंधित केंद्र प्रमुख, यांच्याकडे १५ दिवसात सादर करावी.
- Lock in period समाप्त झाल्यानंतर करारनामा रद्द करावयाचा असल्यास ठेविदार कडून ३ महिने आधी नोटीस दिली जाईल किंवा वखार महामंडळास गोदामाची आवश्यकता भासल्यास महामंडळाकडून कंपनीला १ महिना आधी नोटीस दिली जाईल. त्याप्रमाणे कंपनीने सदर गोदामाचा ताबा विना अट महामंडळाकडे परत सुपूर्द करण्यात येईल, याबाबत शपथपत्र द्यावे.
- सदर आरक्षित जागेतील साठवणूकी मुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे ठेविदार यांना तोटा झाल्यास त्यास महामंडळ जबाबदार राहणार नाही .
- सदर आरक्षित जागेत साठवणूकीमुळे महामंडळाच्या वखार केंद्रावर निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी  ठेविदार यांची राहील . तसेच वखार केंद्र परिसरात घाण होणार नाही याची  ठेविदार यांनी काळजी  घेऊन आवश्यक ती उपाययोजना करावी.
- ठेविदार यांना व्यवसायासाठी लागणाऱ्या प्राथमिक तसेच आवश्यक सोयी जसे स्वच्छतागृह, पाणी, वीज, इत्यादी ठेवीदाराने स्वत:च्या खर्चाने उपलब्ध करुन घ्यावयाच्या आहेत.
- महामंडळाच्या वखार केंद्रांच्या प्राथमिक बाह्य सुरक्षिततेची जबाबदारी महामंडळाची राहील. तसेच  गोदामाच्या अंतर्गत सुरक्षिततेची जबाबदारी ठेविदार यांची राहील. आवश्यकतेनुसार ठेवीदाराने सुरक्षितेच्या दृष्टिने स्व:खर्चाने सीसीटीव्ही कॅमेरा बसवून घ्यावा.
- विद्युत पुरवठा तसेच शासकीय परवाने /परवानग्या घेण्याची जबाबदारी ठेविदार यांची राहील. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या महामंडळाकडून देण्यात येतील एकुण भाडे देयकावर १०% टीडीएस करुन प्रमाणपत्र संबंधित केंद्रप्रमुख, वखार केंद्र यांचेकडे सादर करावे.
- निविदा धारकाने जाहीरातीत नमुद केलेली सुविधेची प्रत्यक्ष साईट वर भेट देऊन पाहणी/ खात्री करावी त्यानंतरच निविदा सादर करण्यात यावी.